माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.७१८०/२१/अ.क्र.५८४६/२४/०१**

**श्री. दामोदर भंडारी**
बी.डी.डी.बिल्डींग नं.३४, रुम नं.०७, तळमजला,
डॉ.जी.एम.भोसले मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०१८.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/द.**
जी/द.विभाग कार्यालय, ३ रा मजला, ना.म.जोशी मार्ग, धनमिल नाका,
मुंबई-४०० ०१३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण,**
सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग, धनमिल नाका,
ना.म.जोशी मार्ग, मुंबई-४०००१३.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.१२.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०९.१२.२०२४ प्राप्त झाली आहे. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १६.१२.२०२० | ०८.०१.२०२१ | ०२.०२.२०२१ | ०५.०३.२०२१ |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि.०८.०१.२०२१ रोजीचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि.०५.०३.२०२१ रोजीचे आदेश संलग्न करुन दि.२३.०६.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. १६.१२.२०२० अन्वये "Mr. Suresh Dagdu Kunjeer's flower shop, Plot No. 75, Scheme No. 58 Worli hill road, B.G. Kher Marg, Pawar Seth Compound, Worli, Mumbai – 400018 which is only 3.70X1.30 = 4.81=43.39 sq.ft. There was a way earlier there inside the compound. He closed that and made o flower shop. But in the BMC's table survey list it shows that it is 10X15=150 sq.ft. without any profit documents, how and on what basis he is getting / provided 150 Sq.ft. area instead of 39 Sq.ft. area. I need detail information with all documents" माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी दि. ०८.०१.२०२१ रोजी "आपण मागितलेल्या माहितीचा अर्थबोध होत नसल्याने कार्यालयीन वेळेत स्वत: उपस्थित राहून प्रत्यक्ष भेटावे. जेणेकरुन आपणांस आवश्यक असलेली माहिती देणे शक्य होईल.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग यांनी "जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना हवी असलेली माहिती ७ दिवसांत देण्यात यावी" असे आदेश पारित केले.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. २३.०६.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता दुसऱ्यांदा अनुपस्थित आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/दक्षिण विभाग यांनी अपीलार्थी यांना उत्तर दिले आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

26-12-2024

**मुंबई** **( डॉ. प्रदीप व्यास )**

**दिनांक :२६.१२.२०२४** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra